# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 335 /2024-25 दि. 07 / 06 /2024

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी नोंदणीकरिता बायोमेट्रीक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीन बसविण्यात आलेल्या आहेत. सदर मशीन मधील रिपोर्ट नुसारच वेतन अदा करण्याचे मा.आयुक्त महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत.

सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधीनस्त सर्व स्थायी/अस्थायी/ठेका कर्मचारी यांची बायोमेट्रीक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीन मध्ये रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करून घेण्याची कार्यवाही करावी.

काही विभागातून परस्पर त्यांच्या विभागांतर्गत कार्यरत ठेका कर्मचारी यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही केली जात आहे व सदर कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीनमध्ये नोंद करण्यात आलेली नाही. तरी बायोमेट्रिक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीन मधील रिपोर्ट नुसारच वेतन अदा करण्याचे अनुषंगाने सर्व स्थायी/अस्थायी/ठेका कर्मचारी यांनी बायोमेट्रीक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीन मध्ये रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करून घेण्याची कार्यवाही करावी.

तसेच सर्व स्थायी/अस्थायी/ठेका कर्मचारी बायोमेट्रिक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीन मध्ये दैनंदिनरित्या हजेरी नोंदवित आहेत, याबाबत सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी आस्थापना विभागात अहवाल सादर करावा. ठेका कर्मचारी यांच्या बायोमेट्रिक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीन मधील हजेरी रिपोर्टनुसारच देयक अदा केले जाईल, याबाबत सर्व ठेकेदार यांना संबंधित विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी त्यांच्या स्तरावर कळविण्यात यावे.

07.6.2024

(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिक